ePaper
सौरव दास, आशुतोष रांका यांचा तिहार तुरुंगातला मुक्काम वाढला!

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज ™



WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 20 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## निवेदन

विजयादशमीनिमित्त आज 'महाईन्यूज' कार्यालयाला सुट्टी असल्याने उद्या, बुधवार दि. २१ ऑक्टोंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही, याची वाचक, जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.

\- मुख्यसंपादक

### सतेज पाटलांच्या नेतृत्वाखाली समविचारी आघाडीची बाजी

# 'गोकुळ'मध्ये सत्तांतर!




### सतेज पाटील यांच्या आघाडीचे विजयी उमेदवार

- शशिकांत पाटील चुयेकर
- बाबासाहेब श्रीपती चौगुले
- अभिजित प्रभाकर तायशेटे
- किसन बापूसो चौगुले
- राहुल बजरंग देसाई
- बाबासाहेब विष्णू देवकर
- विश्वजित दिनकरराव जाधव
- विद्याधर बाबूराव गुरबे
- सचिन दौलतराव घोरपडे
- अंजना केदारी रेडेकर
- भाग्यश्री धीरज डोंगळे
- शशिकांत शामराव खोत
- राजू जयवंतराव आवळे
- बयाजी देवू शेळके.

### महायुतीच्या आघाडीचे विजयी उमेदवार

- राजेश नरसिंगराव पाटील
- राहुल पी. पाटील
- रणजित के. पाटील
- रणजित दिलीप पाटील
- अंबरिशसिंह संजय घाटगे
- चेतन अरुण नरके
- अजित शशिकांत नरके
- अजित पांडुरंग पाटील
- वीरेंद्र संजय मंडलिक

**महाईन्यूज ।**
**कोल्हापूर**

**कोल्हापूरच्या सहकार सम्राज्यातील सर्वात प्रतिष्ठेचा किल्ला अर्थात गोकुळ दूध संघ अखेर काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील यांनी सर केला. राजकीय प्रतिष्ठेच्या पणाला लागलेल्या या महासंग्रामात सोमवारी विरोधी राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी तब्बल १६ जागांवर विजयाचे सोने लुटले. महायुती प्रणित सत्ताधारी राजर्षी शाहू विकास आघाडीला अवघ्या ९ जागांवरच समाधान मानावे लागले आहे.**

राज्यातील सहकार तत्वावरील सर्वात मोठ्या गोकुळ दूध संघाची निवडणूक राज्यातील महायुतीने प्रतिष्ठेची केली होती. मुख्यमंत्र्यांपासून ते जिल्ह्यातील महायुतीच्या तमाम नेत्यांनी प्रचाराची राळ उठवली होती. तर विरोधात काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी एक हाती प्रचार यंत्रणा राबवली होती. आज मतमोजणीत सकाळी ११ वाजता ५ हजार ४१४ मतांपैकी पहिल्या १६५० मतांमध्ये महायुतीने आघाडी घेतली होती.

मात्र दुपारनंतर पडदा सरकला आणि समविचारी आघाडीने अशी काही मुसंडी मारली. हातकणंगले, शिरोळ, पन्हाळ्याच्या पट्ट्यातून एकमुखी कौल मिळत गेला. या निकालातील सर्वात मोठा धक्का म्हणजे गोकुळचे विद्यमान साम्राज्य हलवणारे महायुतीचे शिलेदार मंत्री हसन मुश्रीफ यांचे चिरंजीव, मावळते अध्यक्ष नविद मुश्रीफ यांना ओबीसी गटातून समविचारीचे शशिकांत खोत यांनी ६९ मतांनी लोळवले. तर त्यांच्यासह गोकुळचे अरुण डोंगळे, विश्वास पाटील या माजी अध्यक्षांना पराभवाची धूळ चाखावी लागली. गतवेळी विरोधी गटाचा गटाची जबाबदारी एक हाती पेलणाऱ्या शौमिका महाडिक यांचा अवघ्या ७ मतांनी झालेला नाट्यमय पराभव हा या निवडणुकीचा टर्निंग पॉईंट ठरला.

गोकुळच्या निवडणुकीत मतदान एकनिष्ठ राहावे मतदाराने एकनिष्ठ राहावे यासाठी यल्लमा रेणुका बाळूमामा हालसिद्धनाथ अशा देवतांच्या शब्दा घालण्यात आल्या होत्या. भंडाऱ्याची राख, देवाच्या शपथा आणि जाडजुड पाकिटासह सहलींच्या मोहाला न भुलता ठरावधारकांनी स्वाभिमानाचा दणका दिल्याचे दिसून आहे.

निकालाचे पडघम वाजताच विरोधातील नेत्यांचे चेहरे हिरमुसले होते. तर दुसरीकडेसतेज पाटील यांच्या अजिंक्यतारा या जनसंपर्क कार्यालयावर जणू दसऱ्यापूर्वीच दिवाळी अवतरली. हजारो शेतकरी, दूध उत्पादक आणि तरुण कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात सतेज पाटलांना खांद्यावर घेतले. गुलालाची मुक्त उधळण, फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. ठरावधारकांनी 'गोकुळचा बाप शेतकरी हाय', 'कैवारी बंटी साहेब, 'गोकुळ वाचला'च्या घोषणांनी आसमंत दणाणून गेला. फेरमतमोजणीचे नाट्य आवरल्यानंतर हा जल्लोष शिगेला पोहोचला. आता गोकुळच्या दूधगंगेतून सत्तांतराचा नवा प्रवाह वाहणार हे निकालाने स्पष्ट झाले आहे.



# पदवीधर नोंदणीचा बड्या नेत्यांनाही विसर

## मतदार यादीतून अनेक नेत्यांची नावे गायब; भाजपच्या वर्तुळात कोणती चर्चा?

**महाईन्यूज । पुणे**

**भारतीय जनता पक्षाची शहराची धुरा सांभाळणाऱ्या; तसेच 'कोअर कमिटी'तील प्रमुख नेत्यांपैकी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच नेत्यांनी 'पदवीधर'साठी स्वतःचे नाव मतदार यादीत नोंदविल्याचा प्रकार समोर आला आहे. याशिवाय शहरातील सत्ताधारी आणि विरोधी पक्षांतीलही प्रमुख नेत्यांनीही 'पदवीधर'साठी नोंदणी केली नसल्याने त्यांनाही या निवडणुकीत मतदान करता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील बैठकीत निवडणुकीच्या कामाबाबत भाजपच्या नगरसेवकांना जाब विचारून सक्रिय होण्याच्या सूचना दिल्यानंतर, आता 'पक्षातील आणि सरकारमधील नेत्यांचे काय,' अशी कुजबूज भाजपच्या वर्तुळात सुरू झाली आहे. 'पदवीधर'च्या मतदारयादीत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह काही प्रमुख पदवीधर नेत्यांची नावे आहेत. मात्र, अन्य महत्त्वाच्या नेत्यांची नावे मतदार यादीत नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये कुजबूज सुरू आहे.

पुणे महापालिकेतील सर्वपक्षीय नगरसेवकांच्या शैक्षणिक पात्रतेकडे पाहिले असता ६१ नगरसेवकांचे पदवीपर्यंत, तर १४ नगरसेवकांचे पदव्युत्तर शिक्षण झालेले आहे. पदवीधर असलेल्या या नगरसेवकांपैकी अनेकांनी 'पदवीधर'साठी नावे नोंदविली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणीचा मुद्दा चर्चेत आला आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाची अंतिम मतदार यादी जानेवारी २०२६मध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर सध्याच्या निवडणुकीसाठी मतदार यादीही प्रसिद्ध करण्यात आली आहे. भाजपने आपल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर जबाबदाऱ्या सोपवल्या असताना पक्षातीलच काही पदाधिकाऱ्यांची पदवीधर मतदार म्हणून नोंदणी झालेली नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात असली, तरी विरोधी पक्षातील अनेक पदवीधर नेत्यांची नावे मतदार यादीत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

### पदवीधर, शिक्षक मतदारांना भरपगारी सुट्टी

पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबरला भरपगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे; तसेच खासगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या मतदारांना मतदानासाठी चार तासांची सवलत देण्याचा आदेश विभागीय आयुक्तालयाने दिला आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील कलम १३५ब नुसार ही सुट्टी मंजूर करण्यात आली आहे. संबंधित मतदार असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना मंजूर नैमित्तिक रजेव्यतिरिक्त ही सुट्टी मिळणार आहे. मात्र, सरकारी कार्यालयांचे कामकाज सुरळीत सुरू राहील, याची दक्षता घेण्याच्या सूचना विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी शीतल तेली-उगले यांनी दिल्या आहेत.

# विश्वविक्रमी ४११२ ढोलवादकांच्या वतीने महेश सूर्यवंशी यांचा सन्मान!

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अभिमान, गणेशभक्तीचा वारसा आणि ढोल-ताशा वादनाची सामूहिक ताकद अधोरेखित करणाऱ्या ढोल ताशा महासंघ, महाराष्ट्राच्या वतीने ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिर येथे विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या नवनिर्वाचित अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल महेश सूर्यवंशी यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तसेच सर्व मान्यवरांना श्री गणेशाच्या महाआरतीसाठी सस्नेह निमंत्रित करण्यात आले.**



### ढोल-ताशा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

ढोल ताशा महासंघ, महाराष्ट्राचे संघटक अनुप साठे, महासंघाचे सदस्य विलास शिगवण, पिंपरी-चिंचवड ढोल ताशा महासंघाचे अध्यक्ष विशाल मानकर, पुणे शहर ढोल ताशा महासंघाचे अध्यक्ष अक्षय बलकवडे, कार्याध्यक्ष अभिजीत कुमावत, सचिव प्रशांत तांबे, खजिनदार मंदार गोसावी, उपाध्यक्ष प्रकाश राऊत आणि वरिष्ठ उपाध्यक्ष रवी बोडके यांचीही यावेळी उपस्थिती होती.

छत्रपती संभाजी महाराजांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' स्मारकस्थळी ४११२ ढोलवादकांच्या सहभागातून साकारलेल्या विश्वविक्रमी ढोलवादनाच्या पार्श्वभूमीवर या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. ढोल-ताशांच्या माध्यमातून महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक व्यापक करण्याबरोबरच पारंपरिक कलांचे जतन आणि संवर्धन करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. हेमंतभाऊ रासने, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा. महेशजी सूर्यवंशी, ट्रस्टचे कोषाध्यक्ष तथा माजी अध्यक्ष सुनीलभाऊ रासने, पत्रकार आनंद सराफ, कुमार रेणुसे, तुळशीबाग गणेशोत्सवाचे कोषाध्यक्ष तथा नगरसेवक नितीनदादा पंडित आणि कसबा गणपती देवस्थानचे अध्यक्ष विनायकजी ठकार गुरुजी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

सार्वजनिक गणेशोत्सव ही केवळ धार्मिक परंपरा नसून सामाजिक एकोपा, सांस्कृतिक जतन आणि लोकसहभागाचे प्रभावी माध्यम आहे. ढोल-ताशा पथकांच्या माध्यमातून ही परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध संघटना आणि कार्यकर्ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. या पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित अध्यक्षांचा सन्मान आणि मान्यवरांचा सहभाग यामुळे गणेशोत्सवाची परंपरा व सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश अधिक दृढ झाला.

हिंदू भूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या वतीने हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे सदस्य प्रताप मोहिते, सामाजिक कार्यकर्ते रवीभाऊ गायकवाड, ट्रस्टचे सदस्य इंद्रजित भोसले, प्रसाद वायकर, समन्वयक गणेश गुरव आदी पदाधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित राहिले. विश्वविक्रमी ढोलवादनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाला नवी उंची देणाऱ्या या उपक्रमाशी संबंधित पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा देणारा सन्मान : आमदार महेश लांडगे

## पंढरपूर येथे ‘क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार’ प्रदान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**कै. क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या ४१ व्या पुण्यस्मरणानिमित्त आमदार महेश लांडगे यांना ‘क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले. क्रांतिवीर वसंतदादा बडवे ट्रस्ट आणि पंढरपूर हिंदू महासभा यांच्या वतीने श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आयोजित सोहळ्यात ह.भ.प. श्री. चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच सोहळ्याचे औचित्य साधून मंडप व्यावसायिकांच्या प्रश्नांना विधानसभेत वाचा फोडल्याबद्दल पंढरपूर मंडप असोसिएशनच्या वतीनेही लांडगे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.**




> क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार राष्ट्रभक्ती आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी अधिक दृढ करणारी प्रेरणा आहे. मंडप व्यावसायिकांनी केलेला सन्मानही त्यांच्या प्रश्नांसाठी अधिक ताकदीने काम करण्याचे बळ देणारा आहे. जनसेवेचा संकल्प अधिक दृढ करत समाजातील विविध घटकांच्या हक्कांसाठी सदैव प्रयत्नशील राहीन.
>
> **- महेश लांडगे**, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

११ हजार रुपये, कुंडलिनी-कृपाणांकित भगवा ध्वज, मानाची शाल आणि सन्मानचिन्ह असे हिंदुत्व शौर्य पुरस्काराचे स्वरूप होते. हा सन्मान राष्ट्रभक्ती, हिंदुत्वनिष्ठा आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी अधिक दृढ करणारी प्रेरणा असल्याची भावना आमदार लांडगे यांनी व्यक्त केली.

सोहळ्यास हिंदू महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी, हिंदू महासभेचे अध्यक्ष विवेक बेनारे, नगरसेवक सौरभ थिटे पाटील, नगरसेवक भागवत बडवे, नगरसेवक ओंकार जोशी, वारकरी संप्रदायाचे पाईक रामकृष्ण महाराज वीर, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे मुख्य पुजारी शंकर महाराज बडवे आदी मान्यवर उपस्थित होते.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारांतून प्रेरणा घेत क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांनी राष्ट्र, धर्म आणि समाजासाठी समर्पित भावनेने कार्य केले. त्यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार स्वीकारण्याचा क्षण अत्यंत भाग्याचा, अभिमानाचा आणि आयुष्यभर प्रेरणा देणारा असल्याचे लांडगे यांनी सांगितले.

या पुरस्कारामुळे सामाजिक कार्याची जबाबदारी आणखी वाढल्याचे नमूद करत, राष्ट्रभक्तीचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि हिंदुत्वनिष्ठ सामाजिक कार्याला बळ देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### मंडप व्यवसायाला उद्योगाचा दर्जा देण्याची मागणी

राज्यातील लाखो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाशी निगडित असलेल्या मंडप व्यवसायाच्या प्रश्नांकडे पावसाळी अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधल्याबद्दल पंढरपूर मंडप असोसिएशनने आमदार लांडगे यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. मंडप व्यवसायाला उद्योगाचा आणि अत्यावश्यक सेवेचा दर्जा मिळावा, तसेच व्यावसायिकांना शासकीय योजना, आर्थिक सवलती आणि विविध कल्याणकारी सुविधांचा लाभ मिळावा, अशी मागणी लांडगे यांनी विधानसभेत केली होती. या विशेष सन्मानावेळी पंढरपूर मंडप असोसिएशनचे अध्यक्ष भगवानभाऊ मनमाडकर, उपाध्यक्ष खंडू नाना निकते, खजिनदार व प्रांतिक सदस्य श्रीमंत गाजरे, सचिव प्रशांत बडवे, सदस्य सुरेश परचंडे, आदित्य जोशी, सागर स्वामी आणि शरद राजगुरू आदी उपस्थित होते. मंडप व्यावसायिकांनी केलेला सन्मान त्यांच्या प्रश्नांसाठी अधिक ताकदीने काम करण्याची प्रेरणा देणारा असल्याचे लांडगे यांनी सांगितले. मंडप व्यावसायिकांच्या हक्कासाठी, सन्मानासाठी आणि रोजगाराच्या संरक्षणासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. या दोन्ही सन्मानांबद्दल आमदार लांडगे यांनी क्रांतिवीर वसंतदादा बडवे ट्रस्ट, पंढरपूर हिंदू महासभा, पंढरपूर मंडप असोसिएशनचे पदाधिकारी आणि उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# 'सिल्वराईज ग्रुप'च्या माध्यमातून रोजगारनिर्मितीला मोठी चालना!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चाकण परिसरातील वाढत्या औद्योगिक विस्ताराला अधिक गती देण्यासोबतच स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यात सिल्वराईज ग्रुप महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय वाटचाल करणाऱ्या सिल्वराईज ग्रुपच्या माध्यमातून औद्योगिक विकासाला चालना मिळण्याबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. शिंदिगाव, चाकण-२ येथे उभारण्यात येणारा ‘सिल्वराईज इंडस्ट्रियल पार्क’ हा या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रकल्प ठरणार आहे.**



### उद्योगविस्तारातून रोजगार आणि स्थानिक विकासाला बळ!

सिल्वराईज ग्रुपने विविध क्षेत्रांत केलेली प्रगती आणि भविष्यातील औद्योगिक विस्ताराच्या दिशेने टाकलेले पाऊल कौतुकास्पद आहे. उद्योगांच्या माध्यमातून केवळ आर्थिक उलाढाल वाढत नाही, तर रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, पूरक व्यवसायांची वाढ आणि परिसराच्या आर्थिक विकासालाही हातभार लागतो. त्यामुळे सिल्वराईज इंडस्ट्रियल पार्कच्या माध्यमातून चाकण परिसरातील औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.

या इंडस्ट्रियल पार्कच्या भूमिपूजनप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे यांनी औद्योगिक विकास आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित केले. औद्योगिक क्षेत्राचा विस्तार झाल्यास स्थानिक तरुणांना तांत्रिक, अभियांत्रिकी, व्यवस्थापन तसेच कुशल आणि अकुशल कामांच्या विविध संधी उपलब्ध होऊ शकतात. यासोबतच वाहतूक, हॉटेल व्यवसाय, विक्री-वितरण आणि अन्य पूरक व्यवसायांनाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

या प्रसंगी उद्योजक कार्तिक लांडगे यांनी उपस्थित राहून सिल्वराईज ग्रुपच्या पुढील वाटचालीसाठी आमदार महेशदादा लांडगे यांच्या वतीने शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यांनी ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक उद्योजक संतोष बारणे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. उद्योगविस्ताराच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीला चालना देणारे आणि स्थानिक विकासाला हातभार लावणारे उपक्रम भविष्यातही यशस्वी व्हावेत, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी, उद्योजकांना व्यवसायविस्तारासाठी पोषक वातावरण आणि औद्योगिक क्षेत्राला नवी ऊर्जा देण्याची क्षमता या प्रकल्पात आहे. सिल्वराईज ग्रुपच्या या पुढाकारामुळे चाकणच्या औद्योगिक विकासाला अधिक गती मिळेल आणि परिसराच्या आर्थिक प्रगतीत मोलाची भर पडेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



## भूमिका

**विरोध प्रदर्शनांवर निर्बंध, आंदोलकांची धरपकड आणि राजधानीतील कडेकोट बंदोबस्त यामुळे केंद्र सरकारच्या लोकशाहीविषयक भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही वर्षांपूर्वी आग्रा येथे एका जागतिक कीर्तीच्या जादूगाराने हजारो प्रेक्षकांसमोर ताजमहाल गायब करून दाखवल्याची चर्चा रंगली होती.**

# जंतर मंतर छू मंतर



आता मोदी सरकारने नवी दिल्लीतील ऐतिहासिक जंतर-मंतर विरोध प्रदर्शनांसाठी बंद करून जणू लोकशाहीतील विरोधाचा आवाजच गायब करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, या निर्णयामुळे सरकारची प्रशंसा होण्याऐवजी टीकेची धार अधिक तीव्र झाल्याचे चित्र दिसत आहे.

जंतर-मंतर हे गेल्या अनेक दशकांपासून आंदोलने, धरणे आणि निषेधाचे महत्त्वाचे केंद्र राहिले आहे. लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांना विरोध करण्याचा अधिकार नागरिकांना आहे. सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे हा गुन्हा नसून लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे विरोध प्रदर्शनांवर निर्बंध घालण्याच्या निर्णयामागील कारणे आणि त्याची आवश्यकता याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका मांडणे गरजेचे आहे.

माजी केंद्रीय गृहसचिव जी. के. पिल्लई यांनीही आंदोलनांच्या संदर्भात संयम आणि समजूतदारपणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आंदोलनादरम्यान कायदा-सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची जबाबदारी असली, तरी त्यासाठी नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांवर अनावश्यक मर्यादा येणार नाहीत, याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

जंतर-मंतरवरील निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर कॅनॉट प्लेस परिसरात सुरू झालेले 'लहराओ तिरंगा' अभियान विशेष लक्ष वेधून घेत आहे. विरोधकांनी आंदोलनासाठी पर्यायी मार्ग शोधत सरकारसमोर नवे आव्हान उभे केले आहे. अभिजीत दिपके आणि त्यांच्या साथीदारांच्या अटकेनंतरही अभियानाला प्रतिसाद मिळाल्याचा दावा केला जात आहे. यावरून आंदोलनांवर निर्बंध घातले तरी असंतोष संपतोच असे नाही, हे स्पष्ट होते.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजप पुन्हा विजयी होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. मात्र, निवडणुकीतील विजयाचे दावे करण्यापेक्षा नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि विरोधकांच्या टीकेला सामोरे जाणे हे कोणत्याही लोकशाही सरकारसाठी अधिक महत्त्वाचे असते. विरोधकांमध्ये वाढणारी एकजूट हीदेखील सत्ताधाऱ्यांसाठी राजकीय आव्हान ठरू शकते.

आजच्या राजकारणात सामाजिक माध्यमांची भूमिका बदलत आहे. तरुण पिढी पारंपरिक माध्यमांबरोबरच यूट्यूब आणि स्वतंत्र पत्रकारांच्या माध्यमांतूनही माहिती मिळवत आहे. त्यामुळे सरकारच्या प्रचाराला पूर्वीइतका प्रतिसाद मिळतोच असे नाही. रोजगार, महागाई, शिक्षण आणि सार्वजनिक सेवांबाबतच्या अपेक्षा पूर्ण न झाल्यास तरुणांमध्ये असंतोष वाढू शकतो. धार्मिक आणि सामाजिक ध्रुवीकरणापलीकडे जाऊन मूलभूत प्रश्नांवर चर्चा व्हावी, अशी अपेक्षाही वाढत आहे.

लोकशाहीची खरी ताकद विरोधकांना शांत करण्यात नसून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात असते. आंदोलने रोखण्यासाठी बॅरिकेड्स उभारता येतील, ठिकाणे बंद करता येतील आणि सुरक्षा वाढवता येईल; मात्र जनतेच्या मनातील प्रश्न अशा उपायांनी संपवता येत नाहीत. सरकारने विरोधाला धोका न मानता लोकशाहीतील आवश्यक संवाद म्हणून स्वीकारले पाहिजे. कारण लोकशाहीत सत्ता टिकवण्याइतकेच महत्त्वाचे असते ते जनतेचा विश्वास टिकवणे. जंतर-मंतरचा प्रश्न याच कसोटीवर केंद्र सरकारची परीक्षा घेत आहे.

## प्रासंगिक »

### न्यायाची खरी ओळख

**एका गावात अमोल नावाचा पोलीस अधिकारी होता. एकदा एका गरीब शेतकऱ्याने गावातील श्रीमंत व्यक्तीविरुद्ध फसवणुकीची तक्रार केली. श्रीमंत व्यक्तीने अमोलवर दबाव आणण्यासाठी राजकीय ओळखीचा वापर केला.**

"ही तक्रार मागे घ्या, नाहीतर तुमची बदली होईल," असा इशाराही दिला. अमोल मात्र शांत राहिला. त्याने शेतकऱ्याची कागदपत्रे तपासली आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवले. चौकशीत श्रीमंत व्यक्तीने खरोखरच शेतकऱ्याची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. अमोलने कोणाचाही दबाव न मानता कायद्यानुसार कारवाई केली. काही दिवसांनी शेतकरी अमोलला भेटला. त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. तो म्हणाला, "साहेब, माझ्याकडे पैसा नाही, मोठी ओळख नाही; पण तुमच्याकडून न्याय मिळेल, हा विश्वास होता." अमोल म्हणाला, "पोलीस वर्दी ही कोणाला घाबरवण्यासाठी नसते. ती प्रत्येक नागरिकाच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी असते." हे ऐकून शेतकऱ्याने त्याला नमस्कार केला.

- तात्पर्य : सत्तेच्या दबावापेक्षा कर्तव्य मोठे आणि ओळखीपेक्षा न्याय श्रेष्ठ असतो.

आजच्या डिजिटल युगात इंटरनेट हे केवळ मनोरंजनाचे साधन राहिलेले नाही, तर शिक्षण, माहिती, संवाद आणि मदत मिळवण्याचे महत्त्वाचे माध्यम बनले आहे. त्यामुळे लहान मुलांना इंटरनेटपासून पूर्णपणे दूर ठेवण्याऐवजी त्यांना त्याचा योग्य वापर शिकवणे आवश्यक आहे.

# मुलांचा इंटरनेट वापर : अधिकारासोबत जबाबदारीही!

मुलांच्या इंटरनेट वापरासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने मांडलेली भूमिका याच दृष्टिकोनातून महत्त्वाची ठरते. मात्र, इंटरनेटचा वापर हा अधिकार असला, तरी त्यासोबत सुरक्षिततेची आणि जबाबदारीची जाणीवही असणे गरजेचे आहे. आधुनिक जीवनात इंटरनेटचा वापर अपरिहार्य झाला आहे. शैक्षणिक माहिती मिळवणे, ऑनलाइन वर्गांना उपस्थित राहणे, विविध कौशल्ये शिकणे आणि जगातील घडामोडी समजून घेणे यासाठी मुलांना इंटरनेटची मदत होते. कोविड महामारीच्या काळात शाळा बंद असताना ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान काही प्रमाणात टाळता आले. त्यामुळे इंटरनेटचे महत्त्व नाकारता येत नाही.



मात्र, इंटरनेटचे फायदे जितके महत्त्वाचे आहेत, तितकेच त्यातील धोकेही गंभीर आहेत. अयोग्य आशय, ऑनलाइन फसवणूक, सायबर छळ, वैयक्तिक माहितीचा गैरवापर आणि अनोळखी व्यक्तींकडून होणारे संपर्क यांमुळे मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. याशिवाय मोबाइलचा अतिवापर, गेमिंगचे व्यसन आणि सोशल मीडियावर अधिक वेळ घालवण्यामुळे मुलांच्या झोपेवर, अभ्यासावर आणि सामाजिक वर्तनावर परिणाम होऊ शकतो.

अशा परिस्थितीत इंटरनेटवर सरसकट बंदी घालणे हा प्रभावी उपाय ठरू शकत नाही. बंदीमुळे मुलांची जिज्ञासा संपत नाही; उलट काही मुले लपूनछपून इंटरनेट वापरण्याचा प्रयत्न करू शकतात. त्यामुळे त्यांना सुरक्षिततेच्या नियमांची माहिती देणे आणि ऑनलाइन धोके ओळखण्याची क्षमता विकसित करणे अधिक आवश्यक आहे.

यासाठी पालकांनी मुलांच्या वयानुसार इंटरनेट वापराचे नियम ठरवावेत. स्क्रीन टाइमची मर्यादा, वयानुरूप आशय, गोपनीयता सेटिंग्ज आणि पालकांच्या देखरेखीचा योग्य वापर यांना महत्त्व द्यावे. मुलांशी संवाद साधताना केवळ निर्बंध लादण्याऐवजी त्यांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. ऑनलाइन काही चुकीचे घडल्यास शिक्षा होण्याच्या भीतीने मुलांनी माहिती लपवू नये, असे वातावरण घरात निर्माण झाले पाहिजे.

शाळा आणि शिक्षकांनीही डिजिटल साक्षरतेला शिक्षणाचा महत्त्वाचा भाग बनवावे. बनावट माहिती ओळखणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे, सायबर छळाची तक्रार करणे आणि इंटरनेटचा अभ्यासासाठी उपयोग करणे यांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मिळायला हवे.

शेवटी, इंटरनेट हे स्वतःहून वरदान किंवा शाप नाही; त्याचा परिणाम वापराच्या पद्धतीवर अवलंबून असतो. मुलांना डिजिटल जगापासून दूर ठेवण्याऐवजी त्यात सुरक्षितपणे वावरण्यास सक्षम करणे ही काळाची गरज आहे. मुलांचा इंटरनेट वापर सुरक्षित, मर्यादित आणि उद्देशपूर्ण बनवण्यासाठी पालक, शिक्षक आणि समाजाने एकत्रित प्रयत्न करणे हाच योग्य मार्ग आहे.

## ।। अभंगवाणी ।।



प्रारब्ध क्रियमाण ।
भक्तां संचित नाहीं जाण ॥१॥

अवघा देव चि जाला पाहीं ।
भरोनियां अंतर्बाहीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंबईत २०२७ मध्ये २३८ वातानुकूलित लोकल

## पनवेल-कर्जत मार्गिका ९९ टक्के पूर्ण; उन्नत डेकच्या कामांना वेग

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवेचे आधुनिकीकरण आणि प्रवासी क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) सप्टेंबर महिन्यात विविध प्रकल्पांमध्ये महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. मुंबईसाठी २३८ वातानुकूलित लोकलची निर्मिती करण्यासाठी एमआरव्हीसी आणि इंटिग्रल कोच फॅक्टरी (आयसीएफ) यांच्यात ७ सप्टेंबर रोजी सामंजस्य करार करण्यात आला. या लोकलचा पुरवठा २०२७ च्या अखेरच्या तिमाहीत सुरू होणार असून, २०३० पर्यंत तो पूर्ण करण्याचे नियोजन आहे. दरम्यान, पनवेल-कर्जत नवीन उपनगरीय दुहेरी मार्गिकेचे काम ९९ टक्के पूर्ण झाले असून विरार-दादर दरम्यान फलाटाच्या उन्नत डेकच्या कामांना वेग आला आहे.**



मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील उपनगरीय रेल्वेची क्षमता वाढविण्यासाठी एमयूटीपी-३ आणि एमयूटीपी-३ए अंतर्गत २,८५६ डब्यांच्या २३८ वातानुकूलित लोकलची निर्मिती करण्यात येणार आहे. या नव्या लोकलमुळे प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवासाची सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. पनवेल-कर्जतदरम्यान २९.६ किमी लांबीच्या नवीन दुहेरी उपनगरीय मार्गिकेचे भौतिक काम ९९ टक्के पूर्ण झाले आहे. या प्रकल्पातील सर्व पूल, रेल्वे उड्डाणपूल; तसेच बोगद्यांचे खोदकाम आणि अस्तरीकरण पूर्ण झाले आहे. एकूण ६९.७० किमीपैकी ६८.७० किमी लांबीच्या मार्गावर रूळ टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.

बोगद्यांमधील खडीविरहित रुळांच्या भागात फ्लॅश बट वेल्डिंग करण्यासाठी विशेष मोबाइल वेल्डिंग यंत्रणेचा वापर करण्यात आला. उर्वरित कामे पूर्ण झाल्यानंतर या मार्गिकेची रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून (सीआरएस) तपासणी केली जाणार आहे. त्यानंतर मार्गिका प्रवासी वाहतुकीसाठी खुली करण्याच्या दिशेने पुढील प्रक्रिया होईल.

उपनगरीय स्थानकांवरील प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी विरार, नालासोपारा, घाटकोपर, दादर आणि वसई रोड स्थानकांवर उन्नत डेकच्या बांधकामासाठी मोठ्या गर्डर टाकण्याची कामे सप्टेंबरमध्ये करण्यात आली. विरार येथे २५ मीटर रुंद आणि ३६० मीटर लांबीच्या उन्नत डेकसाठी १२ आणि २१ सप्टेंबरला तुळया टाकण्यात आल्या. नालासोपारा येथे ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान १८ तुळया बसविण्यात आले. घाटकोपर येथे २२ आणि २३ सप्टेंबरला सात, तर दादर येथे २८ आणि २९ सप्टेंबरला आठ तुळया बसविल्या. वसई रोड येथे ३० सप्टेंबरला फलाट क्रमांक ६ आणि ७ वरील डेकसाठी क्रॉस तुळई बसविण्यात आली.

### विरार-डहाणू चौपदरीकरणालाही गती

विरार-डहाणू रोड चौपदरीकरण प्रकल्पातील सफाळे-वाणगाव विभागात रूळ टाकण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी चार रेल्वे रेकमधून रूळ उतरविण्यात आले आहेत. तसेच, एमयूटीपी-३ए अंतर्गत स्थानक सुधारणा प्रकल्पाचा भाग म्हणून मिरा रोड स्थानकावरील सौरऊर्जा प्रकल्प सप्टेंबरमध्ये कार्यान्वित करून पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. वातानुकूलित लोकलची निर्मिती, पनवेल-कर्जत मार्गिकेची अंतिम टप्प्यातील कामे आणि विविध स्थानकांवरील पायाभूत सुविधांचा विस्तार या माध्यमातून मुंबईच्या उपनगरीय रेल्वेचे आधुनिकीकरण करण्याचे काम सुरू असल्याची माहिती एमआरव्हीसीद्वारे देण्यात आली.

# पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर; मुख्यमंत्री

**महाईन्यूज । सांगली**

**पायाभूत सुविधाच्या गुंतवणूक महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असून शिक्षणासाठी ९० हजार कोटी रूपयांची वार्षिक तरतूद करणारे अग्रेसर राज्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सांगलीत केले. विधान परिषदेच्या पुणे पदवीधर व शिक्षक मतदार संघातील महायुतीचे उमेदवार स्मिता जाधव व कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात मुख्यमंत्री बोलत होते.**



यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, रस्ते, पूल सारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात राज्य शासन आघाडीवर आहे. देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असून सध्या १० लाख कोटींची पायाभूत विकासाची कामे सुरू आहेत. परकीय गुंतवणूक होउन राज्यातील तरूणांना रोजगार उपलब्ध करून देण्यातही महाराष्ट्र आघाडीवर असून गतवर्षी ३० लाख कोटी गुंतवणुकीचे करार करण्यात आले. यापैकी ७५ टक्के उद्योग आज जमिनीवर कार्यान्वीत होत आहेत. यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. पश्चिम महाराष्ट्रात औद्योगिक विकास साधण्यासाठी परकीय गुंतवणूक आवश्यक आहे. देशात होणाऱ्या परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात केली जात असल्याचे रिझर्व्ह बँकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामुळे स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीस सरकारचे नेहमीच प्रोत्साहन देण्याचे धोरण आहे. यापुढेही राहील.

शिक्षण क्षेत्रावर सर्वाधिक बजेट हे सुद्धा महाराष्ट्रात आहे, असा दावा करून मुख्यमंत्री म्हणाले, ९० हजार कोटींची तरतूद शिक्षणासाठी करण्यात आली आहे. देशातील बारा-तेरा राज्याचे वार्षिक बजेटही ६० हजार कोटींचे आहे. शिक्षणासाठी करण्यात आलेली गुंतवणूक हा खर्च नसून मानवसंसाधन निर्मितीची गुंतवणूक आहे. कौशल्य शिक्षण, मुलींना उच्च शिक्षण मोफत करणे मुलांना पन्नास टक्के फीमध्ये शिक्षण देणे आदी धोरण राज्य शासन राबवत आहे. शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासन कटिबध्द आहे असेही त्यांनी सांगितले.

शेतीमाल निर्यातीतही महाराष्ट्र एक नंबरला राहावा यासाठी प्रयत्न असून यासाठी सिंचन सुविधांना प्राधान्य देण्यात आले आहे. दुष्काळी भागात सिंचन योजनांचे पाणी पोहचविण्याचे काम महायुती शासनानेच केले असून वर्षानुवर्षे रखडलेली टेंभू योजना आमच्या सरकारनेच पूर्ण केली. शेतकऱ्यांना वीज माफी देण्याची योजनाही आमच्या शासनानेच अंमलात आणली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, माजी पालकमंत्री आमदार डॉ.सुरेश खाडे, आ.सुधीर गाडगीळ, आ. सत्यजित देशमुख, आ. इद्रिस नायकवडी, आ.अरुण लाड, आ. सदाभाऊ खोत, आ. गोपीचंद पडळकर, जनसुराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम, भाजपचे प्रदेश सचिव शरद लाड यांच्यासहित महायुती मधील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने या सभेत उपस्थित होते.

# फ्रान्समध्ये हिंसाचाराचा भडका!

## लूटमार, जाळपोळ आणि दुकानांची नासधूस; १,८०० जणांना अटक, ५०० पोलीस जखमी

**महाईन्यूज । पॅरिस**

**फ्रान्समध्ये महागाई आणि निकृष्ट सरकारी सेवेविरोधात शनिवारी लक्षावधी आंदोलकांच्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. आंदोलनादरम्यान उसळलेल्या दंगलीत 'टाउन हॉल' जाळण्यात आला, दुकानांची नासधूस करण्यात आली. फ्रान्समध्ये देशभरात सुमारे १८०० जणांना अटक करण्यात आली असून, ५०० पोलीस जखमी झाले आहेत. एका निदर्शकाचा हृदयविकाराने मृत्यू झाला. केवळ पॅरिसमध्ये ८५५ जणांना अटक करण्यात आली.**






फ्रान्समध्ये महिनाभरापासून विद्यार्थ्यांची आंदोलने सुरू आहेत. शाळांची बिघडलेली स्थिती, पायाभूत सुविधांची आणि शिक्षकांची कमतरता हे मूलभूत मुद्दे घेऊन विद्यार्थ्यांची आंदोलने सुरू होती. शनिवारी देशभरात झालेल्या निदर्शनांमध्ये लक्षावधी लोक सहभागी झाले. विद्यार्थ्यांच्या या मूलभूत मागण्यांसह महागाई आणि निकृष्ट सरकारी सेवांविरोधातही आंदोलनामध्ये समाचार घेण्यात आला. अनेक ठिकाणी शांततामय मार्गाने आंदोलन झाले असले, तरी काही हिंसक गटांनी सरकारी इमारतींना लक्ष्य केले. दुकानांमध्ये लूटमार केली. पोलिसांच्या वाहनांना लक्ष्य केले.

लिमोज शहरात १९व्या शतकातील 'सिटी हॉल' जळून खाक झाला. पॅरिससह, मार्सेल, लियाँ, बोर्डो, रेन, स्ट्रासबर्ग, ग्रेनोबेल, नीस, लिमोज या शहरांमध्ये शेकडो व्यावसायिकांची दुकाने लुटण्यात आली. यामागे अतिरेकी डाव्या गटांचा हात असल्याचा आरोप पंतप्रधान सेबास्तीयन लेकोर्नू यांनी केला.

> फ्रान्समध्ये हिंसेला थारा नाही. ज्यांनी नासधूस केली आहे, व्यावसायिक दुकानांवर हल्ले केले आहेत आणि नगर परिषदांचीही (टाउन हॉल) लूट केली आहे, त्यांना पकडून शिक्षा ठोठावण्यात येईल.
>
> **- इमॅन्युएल मॅक्रॉन,**
> **अध्यक्ष, फ्रान्स**

## लखनौमधील कॅफे मालकाच्या हत्या प्रकरणाला नवे वळण; DCP ची बदली

**महाईन्यूज । उत्तर प्रदेश**

**उत्तर प्रदेशातील लखनौ येथे कॅफे मालक शिवा शर्मा (वय २७) याच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाला आता मोठे वळण मिळाले आहे. या प्रकरणाचा तपास योग्य रितीने न झाल्याच्या संशयावरून लखनौचे पोलीस उपायुक्त विक्रांत वीर यांची तडकाफडकी बदली करण्यात आली असून, या प्रकरणातील फरार मुख्य आरोपी मॉडेल-इन्फ्लुएन्सर श्रद्धा दुबे, तिची बहीण रश्मी दुबे आणि चालक तनवीर अली उर्फ दानिश यांच्या अटकेसाठी जाहीर केलेले बक्षीस दुप्पट करून आता प्रत्येकी ५० हजार रुपये करण्यात आले आहे. या तिन्ही आरोपींविरोधात न्यायालयाकडून अजामीनपात्र वॉरंटही जारी करण्यात आले आहेत. याशिवाय, हजरतगंज पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी विक्रम सिंह यांनाही पदावरून हटवत पोलीस लाइन्समध्ये पाठवण्यात आले आहे.**





९ ऑक्टोबरच्या रात्री लखनौमधील उच्चभ्रू हजरतगंज परिसरातील 'अवध ग्रीन' अपार्टमेंटच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडून शिवा शर्मा याचा जागीच मृत्यू झाला होता. घटनेच्या वेळी तो केवळ अंतर्वस्त्रात होता आणि त्याच्या शरीरावर लिपस्टिकच्या खुणा आढळल्याने या प्रकरणाचे गूढ वाढले होते. शिवाला इमारतीवरून खाली ढकलून त्याची हत्या करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे. पोलीस तपासात शिवा आणि मॉडेल श्रद्धा दुबे मागील तीन महिन्यांपासून याच अपार्टमेंटमध्ये लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत असल्याचे उघड झाले असून, अलीकडेच श्रद्धाची बहीण रश्मीही त्यांच्यासोबत राहण्यासाठी आली होती. या प्रकरणात श्रद्धा, रश्मी आणि त्यांचा चालक तन्वीर अली उर्फ दानिश यांचा शोध सुरू आहे.

पोलिसांच्या तावडीतून फरार असलेली आरोपी श्रद्धा दुबे हिने सोशल मीडियावर किमान तीन वेगवेगळे व्हिडिओ शेअर करत आपण पूर्णपणे निर्दोष असल्याचा दावा केला आहे. एका व्हिडिओमध्ये तिने, शिवाच्या आईचा आमच्या नात्याला तीव्र विरोध होता, कारण शिवापेक्षा माझे वय मोठे होते, असा दावा केला आहे. आपल्या निर्दोषत्वाची खात्री करण्यासाठी पोलिसांनी अपार्टमेंटमधील सीसीटीव्ही फुटेज तपासावे, अशी मागणी तिने केली आहे.

दुसऱ्या एका व्हिडिओमध्ये श्रद्धाने, शिवाची ओळख चार महिन्यांपूर्वी झाली होती आणि तो प्रचंड आर्थिक अडचणीत होता, असे म्हटले आहे. शिवावर १६ ते १७ लाख रुपयांचे कर्ज होते आणि त्याने आपल्याकडून पैशांची मदत मागितल्याचा दावा तिने केला. मृत्यूपूर्वी महिनाभर आधी त्याने आपल्या घरातून ५ ते ६ लाख रुपयांचे दागिने नेले होते, असे सांगत तिने एका व्हिडिओमध्ये शिवाने ही चूक मान्य केल्याचा दावाही केला. या मानसिक तणावातून आणि चालकाला या प्रकरणात विनाकारण गोवून मारहाण केल्यामुळे आपण घाबरून तेथून पळून गेल्याचे तिने स्पष्ट केले आहे. मात्र, श्रद्धाच्या या सर्व दाव्यांची अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

### पोलिसांकडून चौकशी

मुख्य आरोपी श्रद्धा दुबे हिचे मूळ गाव रायबरेली येथे असून, लखनौ पोलिसांनी तिच्या भूतकाळाची आणि पार्श्वभूमीची माहिती गोळा करण्यासाठी तेथे धाव घेतली आहे. तिचे वडील शिवप्रसाद दुबे यांच्याशीही शेजाऱ्यांचे फारसे संबंध नव्हते आणि त्यांनी घराबाहेर पडणेही टाळले होते, अशी माहिती समोर आली आहे.

"श्रद्धाच्या कुटुंबाने परिसरातील जवळपास सर्वांशी संबंध तोडले होते. त्यांनी घराबाहेर पडणेही कमी केले होते," असे त्या रहिवाशाने म्हटले.

दरम्यान, लखनौ पोलिसांनी श्रद्धाच्या पार्श्वभूमीबाबत माहिती गोळा करण्यासाठी रायबरेली येथे भेट दिली. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके छापे टाकत असल्याचे पोलीस उपायुक्त विक्रांत वीर यांनी यापूर्वी सांगितले होते. आता तिघांच्या अटकेसाठीचे बक्षीस वाढवण्यात आले असून, त्यांचा शोध सुरू आहे.

# क्रिती सॅनन हॉरर चित्रपटात

अभिनेत्री क्रिती सेनॉन एका हॉरर चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकतीच तिच्या आगामी प्रोजेक्टबद्दल माहिती समोर आली आहे. गेल्या काही वर्षांत हॉरर चित्रपटांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली असून प्रेक्षकांकडून या प्रकारच्या चित्रपटांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. मात्र, हा चित्रपट प्रेक्षकांना खऱ्या अर्थाने भीतीचा सामना करायला लावणारा आहे.

मिडिया रिपोर्टनुसार, 'भेडिया' नंतर कृती सॅनॉनला मॅडॉक फिल्म्सकडून एक बिग बजेट चित्रपटाची ऑफर मिळाला आहे. क्रितीने या नव्या चित्रपटासाठी होकार दिला असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, चित्रपटाची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. यामध्ये क्रिती पहिल्यांदाच एका वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे. सध्या या प्रोजेक्टवर काम सुरु असून प्री-प्रोडक्शनला सुरुवात झाल्याचे सांगितले जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून क्रिती मॅडॉक फिल्म्ससोबत जोडलेली आहे. मॅडॉक फिल्म्स ही निर्मिती संस्था 'भेडिया', 'स्त्री' आणि 'स्त्री २' सारख्या हॉरर-कॉमेडी जॉनरच्या निर्मितीसाठी ओळखली जाते. मात्र, या प्रोडक्शन हाऊसने 'मुंज्या' आणि 'रुही' यांसारखे हॉरर चित्रपटही निर्मित केले आहेत. कृतीचा हॉरर चित्रपट या यादीतील तिसरा चित्रपट असेल. 'मिमी' नंतर या प्रोडक्शन हाऊससोबतचा हा तिचा हा मुख्य भूमिकेतील चित्रपट असेल. कृतीचा 'मिमी' चित्रपटही अनेकांच्या पसंतीस उतरला. विशेष म्हणजे या चित्रपटासाठी तिला राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे. यानंतर आता क्रिती तिच्या आगामी हॉरर चित्रपटात एका वेगळ्या भूमिकेत दिसणार असल्याने चाहत्यांचीही उत्सुकता वाढली आहे.




# हृतिकच्या कॅमिओची चर्चा

सुपरस्टार रजनीकांत यांचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'जेलर २' प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवसापासून चर्चेत आला आहे. चित्रपटातील दमदार ॲक्शन सीन्स, रजनीकांत यांची खास शैली आणि अनिरुद्ध रविचंद्रनचे जबरदस्त पार्श्वसंगीत यांना प्रेक्षकांकडून पसंती मिळत असल्याच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत. विशेष म्हणजे, बॉलिवूड अभिनेता हृतिक रोशन याच्या कॅमिओचीही जोरदार चर्चा होत आहे. 'जेलर २' हा २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या आणि प्रचंड लोकप्रिय ठरलेल्या 'जेलर' चित्रपटाचा सीक्वल आहे. या चित्रपटात रजनीकांत पुन्हा एकदा निवृत्त जेलर मुथुवेल पांडियन (टायगर) यांच्या भूमिकेत दिसत आहेत. त्यांच्या दमदार अभिनयासह ॲक्शन सीन्स आणि पडद्यावरील स्वॅग प्रेक्षकांना खेळवून ठेवत आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन नेल्सन दिलीपकुमार यांनी केले असून, अनिरुद्ध रविचंद्रनने आपल्या पार्श्वसंगीतातून चित्रपटातील अनेक प्रसंग अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला आहे. काही प्रेक्षकांनी चित्रपटाला 'मास एंटरटेनर' म्हटले आहे, तर काहींनी रजनीकांतच्या पडद्यावरील उपस्थितीचे विशेष कौतुक केले आहे. 'जेलर २'मध्ये रजनीकांत यांच्यासोबत रम्या कृष्णन, योगी बाबू, जॅकी श्रॉफ, मोहनलाल आणि शिवराजकुमार यांसारखे कलाकार आहेत. याशिवाय विद्या बालन, मिथुन चक्रवर्ती, हृतिक रोशन आणि नोरा फतेही यांच्या कॅमिओ भूमिका आहेत.



# क्रिकेटच्या मैदानात समानतेचा नवा डाव!

## महिला-पुरुष एकाच संघातून खेळणार; श्रीलंकेत 'टेस्ट ट्वेन्टी' स्पर्धेचा थरार

**महाईन्यूज । कोलंबो**

**क्रिकेटच्या मैदानावर महिला आणि पुरुष खेळाडू एकाच संघातून खेळताना दिसणार आहेत. क्रिकेटविश्वात महिला आणि पुरुष क्रिकेटपटूंना एकाच संघात खेळण्याची संधी देणाऱ्या 'टेस्ट ट्वेन्टी' या अनोख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. श्रीलंकेतील कोलंबो येथील सिंहलीज स्पोर्ट्स क्लबच्या (एसएससी) मैदानावर १४ ते २९ नोव्हेंबरदरम्यान ही स्पर्धा रंगणार आहे. पारंपरिक क्रिकेटच्या चौकटीपलीकडे जाऊन समानतेची संकल्पना प्रत्यक्ष मैदानावर आणण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे.**



या स्पर्धेत १३ ते २१ वयोगटातील १६० युवा क्रिकेटपटू सहभागी होतील. जगभरातील खेळाडूंची निवड करून चार खंडीय संघ तयार केले जाणार आहेत. प्रत्येक संघात २० मुली आणि २० मुलगे, असे एकूण ४० खेळाडू असतील. महिला आणि पुरुष खेळाडूंनी केलेल्या धावा एकत्र मोजून सामन्याचा निकाल ठरवला जाणार आहे.

या स्पर्धेत प्रत्येक सामना एकाच दिवसात खेळवला जाईल. प्रत्येक संघाला दोनदा फलंदाजीची संधी मिळेल आणि सामन्याचे एकूण स्वरूप ८० षटकांचे असेल. पहिल्या ४० षटकांचा खेळ दिवसा लाल चेंडूने आणि पांढऱ्या पोशाखात होईल. त्यानंतर उर्वरित ४० षटकांचा खेळ रंगीत पोशाखात पांढऱ्या चेंडूने फ्लडलाइट्सच्या प्रकाशात खेळवला जाईल. पहिल्या सत्रात केलेल्या धावा दुसऱ्या सत्रातही एकूण धावसंख्येत कायम धरल्या जातील.

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे समानतेसाठी तयार करण्यात आलेले 'पॅरिटी नियम'. आयोजकांच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, फ्लडलाइट्सखालील सत्रात मुलींनी केलेल्या धावांच्या आधारे मुलांच्या विजयाचा, तर मुलांनी केलेल्या धावांच्या आधारे मुलींच्या विजयाचा निर्णय ठरविण्याची संकल्पना या नियमांत मांडण्यात आली आहे. नाणेफेक आणि सामन्याच्या स्वरूपानुसार या समीकरणात बदल होऊ शकतो, असेही आयोजकांनी नमूद केले आहे.

'टेस्ट ट्वेन्टी'चे संस्थापक आणि 'पॅरिटी नियम' तयार करणारे गौरव बहिरवानी यांनी समानतेचे तत्त्व प्रसारणातही लागू करण्याची भूमिका मांडली आहे. सामन्याच्या प्रसारणामध्ये मुली आणि मुलांना समान वेळ देण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या स्पर्धेच्या सल्लागार मंडळात एबी डिव्हिलियर्स, मॅथ्यू हेडन आणि सर क्लाइव्ह लॉयड यांसारख्या दिग्गज क्रिकेटपटूंचा समावेश आहे. जागतिक निवड समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दिल्लीचे प्रशिक्षक राजकुमार शर्मा सांभाळणार आहेत, तर स्पर्धेच्या आयोजनाची धुरा माइक फोर्डहॅम यांच्याकडे असेल. महिला आणि पुरुष खेळाडूंना एकाच संघातून खेळण्याची संधी, समानतेवर आधारित नियम आणि प्रसारणातील समान प्रतिनिधित्व या वैशिष्ट्यांमुळे 'टेस्ट ट्वेन्टी' स्पर्धेकडे क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले आहे.

### 'टेस्ट ट्वेन्टी'ची वैशिष्ट्ये

'टेस्ट ट्वेन्टी' स्पर्धेत चार खंडीय संघ सहभागी होणार असून, प्रत्येक संघात २० मुली आणि २० मुलगे असतील. प्रत्येक सामना ८० षटकांचा असेल. पहिल्या सत्रात लाल चेंडूने, तर दुसऱ्या सत्रात फ्लडलाइट्सखाली पांढऱ्या चेंडूने खेळ होईल. महिला आणि पुरुष खेळाडूंच्या सहभागाला समान महत्त्व देणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

# बाबर आझमचा धावांचा 'षटकार'! १६ हजारांचा टप्पा पार

**महाईन्यूज । रावळपिंडी**

**पाकिस्तानचा आघाडीचा फलंदाज बाबर आझम याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ हजार धावांचा टप्पा पूर्ण करत आपल्या कारकिर्दीत आणखी एका महत्त्वाच्या कामगिरीची नोंद केली आहे. श्रीलंकेविरुद्ध रावळपिंडी येथे झालेल्या एकदिवसीय सामन्यात ४५ धावांची खेळी करत बाबरने हा टप्पा गाठला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करत मोठी धावसंख्या उभारणे हे प्रत्येक फलंदाजासाठी महत्त्वाचे असते. बाबरच्या या कामगिरीमुळे त्याच्या कारकिर्दीतील यशाची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.**

बाबर आझम गेल्या काही वर्षांपासून पाकिस्तानच्या फलंदाजीचा प्रमुख आधार राहिला आहे. त्याचे फलंदाजीतील तंत्र, चेंडूच्या टप्प्याचा अचूक अंदाज आणि मैदानाच्या विविध भागांत फटके मारण्याची क्षमता ही त्याची वैशिष्ट्ये मानली जातात. कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० अशा तिन्ही प्रकारांत त्याने धावा जमवल्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ हजार धावांचा टप्पा गाठणे ही त्याच्या कारकिर्दीतील महत्त्वाची उपलब्धी ठरली आहे.

दिलेल्या आकडेवारीनुसार, बाबरने १६ हजार आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण करण्यासाठी ३९९ डाव घेतले. भारताचा दिग्गज फलंदाज विराट कोहली याने हा टप्पा ३५० डावांत गाठला होता. त्यामुळे कमी डावांत हा टप्पा पूर्ण करण्याच्या बाबतीत कोहलीची कामगिरी अधिक वेगवान ठरते. कोहलीने अनेक वर्षे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सातत्य राखत धावांचे अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. बाबरच्या कामगिरीची तुलना कोहलीशी होत असली, तरी दोन्ही फलंदाजांच्या कारकिर्दीतील कामगिरीचा विचार करताना सामने, डाव आणि क्रिकेटचे प्रकार यांचा संदर्भ महत्त्वाचा ठरतो.

एकदिवसीय क्रिकेटमध्येही बाबरच्या कामगिरीची चर्चा होत आहे. दक्षिण आफ्रिकेचा माजी फलंदाज हाशिम आमला हा वनडे क्रिकेटमधील वेगवान धावा जमवणाऱ्या फलंदाजांपैकी एक म्हणून ओळखला जात होता. त्याने आपल्या कारकिर्दीत सातत्यपूर्ण फलंदाजी करत अनेक महत्त्वपूर्ण खेळी केल्या. बाबरने वनडेतील धावांच्या बाबतीत आमलाला मागे टाकल्याचे दिलेल्या माहितीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील बाबरच्या कामगिरीकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे.

वनडे क्रिकेटमध्ये फलंदाजाला प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळ्या आव्हानांचा सामना करावा लागतो. सुरुवातीच्या षटकांत विकेट न गमावता धावा करणे, मधल्या षटकांत डावाला आकार देणे आणि अखेरच्या षटकांत धावांचा वेग वाढवणे, यासाठी संयम आणि आक्रमकता यांचा योग्य समतोल राखावा लागतो. बाबरच्या फलंदाजीतील संयम आणि डाव उभारण्याची क्षमता यामुळे त्याने या प्रकारात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे.

पाकिस्तानच्या संघासाठी बाबर आझमचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. संघ अडचणीत असताना डाव सावरणे, मोठ्या धावसंख्येचा पाया रचणे आणि प्रतिस्पर्धी गोलंदाजांचा सामना करणे, अशा जबाबदाऱ्या त्याच्याकडून अपेक्षित असतात. त्यामुळे त्याच्या वैयक्तिक कामगिरीचा परिणाम संघाच्या एकूण कामगिरीवरही होतो. श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यातील ४५ धावांची खेळी त्याच्यासाठी महत्त्वाची ठरली असून, आगामी सामन्यांतही त्याच्याकडून मोठ्या खेळींची अपेक्षा असेल.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ हजार धावांचा टप्पा गाठणे ही बाबरच्या कारकिर्दीतील महत्त्वाची नोंद आहे. मात्र, विराट कोहलीसारख्या अनुभवी फलंदाजाच्या विक्रमी वेगाशी तुलना होत असताना सातत्यपूर्ण कामगिरी कायम ठेवणे हे बाबरसमोरील आव्हान असेल. आगामी सामन्यांत त्याची फलंदाजी कशी होते आणि तो पाकिस्तानच्या संघाला विजय मिळवून देण्यात किती योगदान देतो, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.



स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।

दि. 20 ऑक्टोबर 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# औद्योगिक गुणवत्तेचा भोसरीत महाकुंभ!

## क्वालिटी सर्कल फोरमच्या ४१ व्या विभागीय अधिवेशनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भोसरी येथील क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाच्या , पुणे चॅप्टरच्या वतीने ४१ वे गुणवत्ता संकल्पनावरील विभागीय वार्षिक अधिवेशन २०२६ चे भोसरी येथील क्वालिटी सर्कल एक्सलन्स सेंटर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले.**

यंदाच्या अधिवेशनात महाराष्ट्रातील १०० हून अधिक नामांकित औद्योगिक संस्थांनी सहभाग घेतला. दोन दिवस चाललेल्या या गुणवत्ता महोत्सवात एकूण ३०० हून अधिक केस स्टडीज, ५७ घोषवाक्य आणि ६३ पोस्टर स्पर्धकांनी सादर करण्यात आले. विजेत्याना मान्यवरांच्या हस्ते सुवर्ण, रजत व कास्य पदक , प्रशस्तीपत्रक देवुन त्याना सन्मानपुर्वक गौरविण्यात आले . या स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी ३८ परीक्षक लाभले होते, तर एकूण १३०० हून अधिक स्पर्धक, व्यवस्थापक आणि गुणवत्ता प्रेमींनी या अधिवेशनात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन दाना आनंद इंडिया प्रा. लि. चे बिझनेस युनिट हेड बालाजी माळी याच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे आयकॉन हॉस्पीटलचे संचालक, अध्यक्ष डॉ. प्रताप पोपट सोमवंशी, पिंपरी चिंचवड होमिओपथीक असोसिएशनचे माजी शहराध्यक्ष डॉ. संदीप लुणावत, क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश काळोखे, पुणे चॅप्टरच्या माजी अध्यक्षा व संचालिका डॉ .रजनी इंदुलकर, फोरमचे पदाधिकारी प्रकाश यार्दी, धनंजय वाघोलीकर , अनंत क्षीरसागर, माधव बोरवणकर,




परवीन तरफदार , खजीनदार संजीव शिंदे , व्यवस्थापक चंद्रशेखर रुमाले उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी क्वालिटी सर्कल चळवळीचे महत्त्व अधोरेखित करताना, उत्पादन क्षेत्रापासून सेवा क्षेत्रापर्यंत गुणवत्ता, उत्पादकता आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी क्वालिटी सर्कल हे एक प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. दोन दिवस चाललेल्या या अधिवेशनात विविध संस्थांतील कर्मचाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील समस्या, त्यावरील उपाययोजना आणि त्यातून मिळालेले फायदे यांचे प्रभावी सादरीकरण केले. गुणवत्ता व्यवस्थापन, खर्चात बचत, सुरक्षितता आणि कार्यपद्धतीत सुधारणा या विषयांवरील केस स्टडीज विशेष आकर्षण ठरल्या.

या अधिवेशनामुळे उद्योगांमधील सर्वोत्तम पद्धतींची देवाण-घेवाण होण्यास मदत झाली असून, कर्मचाऱ्यांमध्ये टीमवर्क आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होण्यास प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाची प्रस्तावना माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश काळोखे यांनी केली .सुत्रसंचालन विजया रुमाले व खजीनदार संजीव शिंदे यांनी तर आभार फोरमच्या संचालिका डॉ. रजनी इंदुलकर यांनी मानले .

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुणे चॅप्टरचे व्यवस्थापक चंद्रशेखर रुमाले , प्रशांत बोराटे , राहिममिर्झा बेग या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### गुणवत्ता सुधारणेचा प्रभावी मंच

दोन दिवसीय अधिवेशनात ३०० हून अधिक केस स्टडीज, ५७ घोषवाक्ये आणि ६३ पोस्टर्सचे सादरीकरण करण्यात आले. गुणवत्ता व्यवस्थापन, खर्चात बचत, कामाच्या ठिकाणची सुरक्षितता आणि कार्यपद्धतीतील सुधारणा यांवर भर देण्यात आला. विविध उद्योगांतील सर्वोत्तम कार्यपद्धतींची देवाणघेवाण आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यविकासाला या अधिवेशनातून चालना मिळाली.

# राजमाता जिजाऊच्या शिलेदारांचा सातव्यांदा विजयाचा षटकार!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मदनलाल धिंग्रा मैदान निगडी येथे झालेल्या शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालय लांडेवाडी भोसरी येथील 19 वर्षाखालील मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात सलग सातव्यांदा विजेतेपद संपादन करून रोमहर्षक विजय मिळविला. 19 वर्षाखालील मुलांच्या अंतिम सामन्यात प्रथम नाणेफेक जिंकलेल्या सिम्बायोसिस ज्युनिअर कॉलेजच्या संघाने राजमाता जिजाऊ ज्युनिअर कॉलेजच्या संघाला फलंदाजीसाठी आमंत्रित करण्यात आले.**




राजमाता जिजाऊ संघाने 10 ओव्हर मध्ये 02 बाद 151 धावांचे आव्हान सिम्बायोसिस ज्युनिअर कॉलेजच्या संघाला देण्यात आले होते त्याला प्रत्युत्तर देताना सिम्बायोसिसज्युनियर कॉलेज संघ हे आव्हान पूर्ण करू शकला नाही त्यांनी 110ओव्हर मध्ये ओव्हर 65/5 धावा काढल्या त्यामुळे सलग सातव्यांदा विजयाची नोंद केली. या विजयात प्रतिक कडलग याने 41 संतोष चव्हाण 33 धावा, केंगार अभिनव याने 28 धावा तेजस गिलबिलेने 24 धावा करत संघाच्या धावसंख्या उभारण्यात मोलाची कामगिरी केली.

तसेच रोनीत पोद्दार, विहान बागड, माने तन्मय, आर्यन चौव्हाण,अभिनव जमदाडेयांनीभेदकगोलंदाजीकरत संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली त्यामुळे राजमाता जिजाऊ ज्युनिअर कॉलेजच्या संघाची त्रिमूर्ती स्कूल नेवासा फाटा नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे होणाऱ्या,शालेय विभागस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

या विजयी संघात कु. आदित्य शेंडगे, ध्रुवील रायठ्ठा, शंतनू फाटे, सोहम मोहिते, तन्मय पाटील, साई गुंजाळ, अखिलेश पाटील, रोनीत पोद्दार, विहान बागड, माने तन्मय, आर्यन चौव्हाण, अभिनव जमदाडे, प्रतीक कडलक, तेजस गिलबिले, अभिनव केंगार, संतोष चव्हाण या सर्व खेळाडूंचा समावेश होता.

या सर्व खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे व प्रशिक्षक श्री.दत्तात्रेय वाळके यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी चे प्रथम आमदार मा.श्री. विलासराव लांडे साहेब यांनी विशेष अभिनंदन करून खेळाडूंना विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिं.चिं.मनपा स्थायी समिती मा.अध्यक्ष श्री अजित भाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री सुधीरभाऊ मुंगसे सर,पिं.चिं. मनपाचे नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी, उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

# आज कचऱ्याचे ढीग, उद्या ५,८०० टनांचा डोंगर!

## शहराच्या वाढत्या कचऱ्याची महापालिकेला चिंता; विकेंद्रित प्रक्रियेसाठी दहा ठिकाणे निश्चित

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या कचऱ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी महापालिका प्रशासनाने विकेंद्रित कचरा व्यवस्थापनावर भर दिला आहे. शहरात दहा ठिकाणी अत्याधुनिक कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्याचे नियोजन करण्यात आले असून, त्यासाठी ४० जागांची पाहणी करून दहा जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. या केंद्रांमुळे मोशी कचरा डेपोवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, पुढील २० वर्षांत शहरात दररोज सुमारे ५ हजार ८०० टन कचरा निर्माण होण्याचा अंदाज असल्याने भविष्यातील कचरा व्यवस्थापनाचे मोठे आव्हान महापालिकेसमोर उभे राहणार आहे.**



मोशी येथील कचरा डेपोवरील दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. कचरा संकलन सुरू असले, तरी शहराच्या विविध भागांत कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत. त्यामुळे मोशी डेपोवरील अवलंबित्व कमी करून शहरातील कचऱ्यावर स्थानिक पातळीवरच प्रक्रिया करण्याची मागणी नगरसेवकांकडून होत आहे. या पार्श्वभूमीवर दहा क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर प्रक्रिया केंद्रे उभारण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे.

यासाठी निगडी प्राधिकरणातील सेक्टर क्रमांक २२, चिंचवडमधील आरक्षण क्रमांक १/८९, प्रभाग १८ मधील आरक्षण क्रमांक २२१, दत्तनगर, दिघीतील गायरान, चोविसावाडीतील आरक्षण क्रमांक २/१६, पुनावळेतील सर्व्हे क्रमांक २३ व २६ मधील काही भाग, गवळीमाथा, कासारवाडी आणि खडकी कटक मंडळाच्या हद्दीतील जागांचा समावेश आहे. या जागांची तांत्रिक तपासणी आणि व्यवहार्यता पडताळून सविस्तर प्रकल्प आराखडे (डीपीआर) तयार केले जात आहेत.

प्रस्तावित केंद्रांवर कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर आणि प्रक्रिया करण्यासाठी विविध सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस व जैवइंधन निर्मिती, कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती तसेच प्लॅस्टिक कचऱ्यापासून विविध उत्पादने तयार करण्याच्या पर्यायांचाही विचार केला जात आहे. जागेचे क्षेत्रफळ आणि स्थानिक गरजांनुसार प्रकल्पांचे स्वरूप निश्चित केले जाणार आहे.

महापालिकेच्या अंदाजानुसार, शहरात पुढील पाच वर्षांत दररोज सुमारे २ हजार २०० टन, दहा वर्षांत ३ हजार ३०० टन, तर २० वर्षांत ५ हजार ८०० टन कचरा निर्माण होऊ शकतो. वाढती लोकसंख्या आणि कचऱ्याचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन शिल्लक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी नवीन वेस्ट टू एनर्जी प्रकल्पही प्रस्तावित करण्यात आला आहे.

दहा ठिकाणी प्रक्रिया केंद्रे उभारण्याचा आराखडा प्रत्यक्षात कधी उतरणार, त्यासाठी किती निधी लागणार आणि प्रकल्प कधी सुरू होणार, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. नियोजनाची अंमलबजावणी वेळेत झाल्यास मोशी डेपोवरील भार कमी करण्याबरोबरच शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यास मदत होऊ शकते.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, निश्चित केलेल्या दहा जागांची तांत्रिक व व्यवहार्यता तपासणी करून प्रकल्प आराखडे तयार करण्याचे काम सुरू असून, ते लवकरच पूर्ण केले जाणार आहेत.

### काय आहे नियोजन?

प्रस्तावित दहा जागांवर क्षेत्रफळानुसार विविध प्रकारच्या घनकचरा प्रक्रिया सुविधा विकसित करणे, कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर, ऊर्जानिर्मिती करणे, जैविक कचऱ्यापासून बायोगॅस व जैवइंधन निर्मिती करणे, प्लॅस्टिक कचऱ्यापासून विविध उत्पादने तयार करण्याचे महापालिका प्रशासनाचे नियोजन आहे.

# ८६ लाखांच्या सायबर फसवणुकीला मकोकाचा दणका!

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**शेअर बाजारातील गुंतवणुकीवर भरघोस परताव्याचे आमिष दाखवून ज्येष्ठ नागरिकाची ८६ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या संघटित सायबर टोळीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत (मकोका) कारवाई केली आहे. या प्रकरणात नऊ आरोपींवर मकोका लावण्यात आला असून, त्यापैकी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान या टोळीचे धागेदोरे कंबोडियातील मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे. तसेच, गोठविण्यात आलेल्या बँक खात्यांतील २८ लाख रुपये फिर्यादीला परत मिळण्यासाठी न्यायालयाचे आदेश प्राप्त झाले आहेत.**

तेजस ज्ञानोबा लोखंडे (२४, रा. मरकळ, पुणे), अविनाश ज्ञानोबा बाकलिकर (२८, रा. लातूर), हर्षल दिलीप बोरा (३४, रा. अहिल्यानगर), सोनू हरिष शर्मा (२१, रा. नवी मुंबई), गौरव रमेश गाडगे (२४, रा. मुंबई) आणि आखील श्रीनिवासराव नेल्लुरी (२४, रा. हैदराबाद, तेलंगणा) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या गुन्ह्यातील अन्य आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका ज्येष्ठ नागरिकाला बनावट ट्रेडिंग ॲपच्या माध्यमातून शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे आमिष दाखविण्यात आले. आरोपींनी विश्वास संपादन करून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये ८६ लाख रुपये जमा करून घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित नागरिकाने सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार १७ जुलै २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

आर्थिक व्यवहारांच्या तपासातून फसवणुकीची रक्कम अनेक बँक खात्यांत वळविण्यात आल्याचे स्पष्ट झाले. बँक खात्यांची माहिती, तांत्रिक तपास आणि खातेदारांच्या चौकशीतून पोलिसांनी पुणे, लातूर, अहिल्यानगर, नवी मुंबई आणि हैदराबाद येथून सहा आरोपींना अटक केली. गोठविण्यात आलेल्या खात्यांतील २८ लाख रुपये फिर्यादीला परत मिळावेत, यासाठी न्यायालयाने आदेश दिले आहेत.



तपासात ही टोळी संघटितपणे आर्थिक फायद्यासाठी काम करीत असल्याचे निष्पन्न झाले. सोशल मीडियावर आकर्षक गुंतवणुकीच्या जाहिराती आणि आमिषे दाखवून नागरिकांना जाळ्यात ओढले जात होते. त्यानंतर विविध बँक खात्यांत पैसे स्वीकारून ते डिजिटल माध्यमातून पुढे वळविले जात होते. फसवणुकीतून मिळालेली रक्कम यूएसडीटीसारख्या आभासी चलनात रूपांतरित केली जात असल्याचेही तपासात समोर आले. या व्यवहारांचे धागेदोरे कंबोडियातील मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचल्याने प्रकरणाचे आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारीशी संबंध असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या टोळीतील आरोपींविरुद्ध पिंपरी-चिंचवड, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर तसेच गुजरातमध्ये विविध गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये फसवणुकीसह अपहरण, खंडणी, दरोडा, अमली पदार्थांची तस्करी आणि बनावट कागदपत्रे तयार करण्यासंबंधीच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून आर्थिक फायदा मिळविण्याच्या उद्देशाने ही टोळी कार्यरत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर मकोकांतर्गत कारवाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला.

पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, सहपोलिस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलिस आयुक्त सारंग आवाड व बसवराज तेली, पोलिस उपायुक्त रोहिदास पवार आणि सहायक पोलिस आयुक्त रोहिणी बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविकिरण नाळे, पोलिस निरीक्षक दिगंबर गायकवाड, सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण स्वामी व वैभव पाटील, पोलिस उपनिरीक्षक सागर पोमण, रोहित डोळस आणि प्रकाश कातकडे यांच्या पथकाने तपासात सहभाग घेतला. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलिस आयुक्त रोहिणी बानकर करीत आहेत.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046